सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ९७ | रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com




## दिनविशेष
२८ डिसेंबर

- गॅलिलिओने नेपच्यून ग्रहाचा शोध लावला, परंतु त्याचे वर्गीकरण स्थिर तारा म्हणून केले.
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस राजकीय पक्षाची स्थापना झाली.
- मुंबई मध्ये 'कसेल त्यांची जमीन' हा कुळ कायदा लागू झाला.

## चकाचक ग्रामीण रुग्णालय...!



### दै. ग्लोबल महातेजच्या बातमीचा दणका

# जिल्हा शल्यचिकित्सकांच्या झाडाझडतीनंतर ग्रामीण रूग्णालय चकाचक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभाराबाबत दै. ग्लोबल महातेजने वेळोवेळी वाचा फोडली आहे. दै.ग्लोबल महातेजच्या बातम्यांची दखल घेऊन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. स्वप्निल सांगळे यांनी शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी पाहणी करून अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. अधिकारी, कर्मचाऱ्यांना स्वच्छतेबाबत सूचना केल्या होत्या. या पार्श्वभूमीवर शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी स्वच्छता करून चकाचक केले आहे.

ग्रामीण रुग्णालयात व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. आधुनिक मशनरीच्या सहाय्याने संपूर्ण वार्ड, मजले, जिने व परिसर घासून-पुसून स्वच्छ करण्यात आले. बेड, उपकरणे तसेच रुग्णालयाचा परिसर आता स्वच्छ, निर्जंतुक व शिस्तबद्ध दिसत आहे. संपूर्ण रुग्णालय चकाचक झाले आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्वतः उभे राहून कर्मचाऱ्यांकडून साफसफाईचे काम करून घेतले. दै. ग्लोबल महातेजच्या दणक्यामुळे न्याय मिळाल्याच्या भावना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केल्या. याची अंमलबजावणी कायमस्वरूपी राहावी, अशी अपेक्षाही व्यक्त केल्या आहेत.

## अमळनेरला गुरुवारी कुस्तीपटूंची निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यस्तरीय अजिंक्य स्पर्धा २०२५- २६च्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील कुस्ती पटूंची निवड चाचणी होणार आहे. गुरुवार, दि. १ जानेवारी रोजी प्रताप महाविद्यालयाजवळील तालुका क्रीडा संकुलात सकाळी ८ वाजेपासून ही निवड चाचणी होईल.

यात १५, १७ व २० वर्ष आतील फ्री स्टाईल, ग्रीकरोमन मुली व वरीष्ठ ग्रीकरोमन गट फीस्टाइल गादी व माती वजन गट ८ ते १० : ३० वाजेपर्यंत पर्यंत, तसेच कुस्ती प्रारंभ साडेदहा वाजेपर्यंत सुरू होतील. अधिक माहितीसाठी विश्वास संतोष पाटील (बाळू ), तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष संजय पाटील, हाजी शब्बीर पैलवान, प्रताप शिंपी, संजय पैलवान, रावसाहेब पाटील, भरत पवार, प्रवीण पाटील व तांत्रिक समिती (८३२९५१६५००, ९०२८३०५७३०, ९६०४४३३७१४)यांच्याशी संपर्क साधावा. कुस्तीपटूंनी मेडिकल सर्टिफिकेट व पालकांचे संमती पत्र आणणे आवश्यक आहे. तसेच एक पासपोर्ट फोटो, आधार कार्डची झेरॉक्स प्रत आणावी, असे आवाहन तालुका कुस्तीगीर संघटनेने केले आहे.

# संतांच्या सान्निध्यात भक्तीचा महासोहळा

## अमळनेरात स्वामिनारायण मंदिर वर्धापनदिन, सुवर्ण महोत्सव साजरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बीएपीएस स्वामिनारायण मंदिराच्या २९व्या वर्धापनदिनानिमित्त तसेच परमपूज्य प्रमुख स्वामी महाराज यांच्या १९७६-२०२६ आगमनाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त भव्य व दिव्य अध्यात्मिक महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शुक्रवार, दि. २६ व शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी विविध अध्यात्मिक कार्यक्रम, शोभायात्रा झाली. या पावन सोहळ्यास सारंगपूर येथील प.पू. ज्ञानेश्वर स्वामी (कोठारी) आदींसह अनेक संत, महंत व स्वामींची उपस्थिती लाभली. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी शहरात सुंदर व भक्तिमय सभेचे आयोजन करण्यात आले होते.



शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी विधिवत अभिषेक झाला. त्यानंतर भगवंतांच्या सान्निध्यात भव्य महायज्ञाचे आयोजन करण्यात आले. वीस कुंडी यज्ञात मंत्रोच्चारांने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. सुमारे अडीच हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत संत- महंत, साधू, बालक, युवक, महिला भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांचा निनाद, श्री स्वामीनारायणांच्या घोषणांनी संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले होते. शोभायात्रे दरम्यान शहरवासियांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून भाविकांचे स्वागत केले. परमपूज्य प्रमुख स्वामीजी महाराज यांच्या अमळनेर आगमनाच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित हा कार्यक्रम श्रद्धा, सेवा आणि संस्कारांचा जिवंत जागर ठरला, अशा भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केल्या.

## खा. शि. मंडळाच्या शिक्षक प्रतिनिधीपदी राहुल पाटील विजयी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या तिन्ही माध्यमिक शाळांच्या शिक्षक प्रतिनिधीपदासाठी शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी जी. एस. हायस्कूलमध्ये निवडणूक घेण्यात आली. यात राहुल जगतराव पाटील सर्वाधिक २२ मतांनी विजयी झाले आहेत.

या निवडणुकीत एकूण सहा उमेदवार रिंगणात होते. संस्थेच्या कायम शिक्षक संघ अंतर्गत ही निवड प्रक्रिया पार पडली. ७५ मतदारांपैकी ७२ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला होता.

एक मत अवैध ठरले होते. उमेदवारनिहाय कसांत मिळालेली मते अशी : राहुल जगतराव पाटील (२२ विजयी), किरण प्रकाश सनेर (१७), अमितकुमार अशोक पाटील (१६), दिनेश नामदेव पालवे (०८), रत्नमाला शालिग्राम सोनवणे (०८) व कल्पेश भालचंद्र सूर्यवंशी (००). कायम शिक्षक संघाचे अध्यक्ष आर. जे. पाटील, सचिव उमाकांत हिरे, सदस्य के. आर. बाविस्कर, एल. सी. बंजारा, व्ही. एच. पाटील यांनी निवडणुकीचे कामकाज पाहिले. राहुल पाटील यांच्या विजयाबद्दल खानदेश शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.











सक्सेस स्टोरी

# रिजेक्शन से उठी जिद! ५० हजार से शुरू किया सफर

## अब १२ राज्यों में कारोबार; हजारों को मिला रोजगार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जीवन में हर व्यक्ति कभी न कभी ऐसे मोड़ पर खड़ा होता है, जब चुनौतियां और असफलताएं उसे आगे बढ़ने से रोकने लगती हैं। नीरज तिवारी भी ऐसे ही समय में थे, जब लगातार नौकरी में रिजेक्शन उनके सामने बाधाओं की तरह उभर रहे थे। हर असफल प्रयास उनके अंदर की उम्मीद को धीरे-धीरे कम करता जा रहा था। फिर भी, उन्होंने हार नहीं मानी। २०१२ में, केवल ५० हजार रुपये की सीमित पूंजी और ढेरों शंकाओं के साथ, नीरज ने हाईटेक ह्यूमन कैपिटल (इंडिया) लिमिटेड (एचएचसीआईएल) कंपनी की नींव रखी। यह कोई बड़ी शुरुआत नहीं थी, बस एक छोटा कदम था। धीरे-धीरे इस छोटे से प्रयास ने आकार लेना शुरू किया। एचएचसीआईएल ने सुरक्षा गार्ड और सुविधा प्रबंधन सेवाओं के क्षेत्र में भरोसे का नाम कमाया। समय के साथ कंपनी का विस्तार हुआ और चार हजार से अधिक कर्मचारी इस सपने का हिस्सा बने। कंपनी अब १२ राज्यों में अपनी सेवाएं दे रही है और लगातार विकसित हो रही है। आज, नीरज तिवारी की दूरदर्शिता के चलते एचएचसीआईएल ने लगभग एक हजार करोड़ रुपये का वार्षिक राजस्व हासिल कर लिया है।

### अपना रास्ता खुद बनाया

नीरज तिवारी ने अपनी पढ़ाई पूरी करने के बाद जब नौकरी की तलाश शुरू की, तो उन्हें लगातार असफलताओं और निराशाओं का सामना करना पड़ा। हर जगह से उन्हें वही परिचित जवाब मिलता 'हम आपको कॉल करेंगे।' इस बार-बार मिलने वाली हताशा ने उन्हें गहराई से सोचने पर मजबूर किया। उन्होंने महसूस किया कि यदि वे सिर्फ अवसरों का इंतजार करते रहे, तो सफलता का रास्ता कठिन और अनिश्चित रहेगा। इसी सोच ने उन्हें यह निर्णय लेने के लिए प्रेरित किया कि अब वे अपने अवसर स्वयं बनाएंगे, दूसरों के भरोसे नहीं रहेंगे। इसी नवीन दृष्टिकोण के साथ उन्होंने एचएचसीआईएल की नींव रखी। नीरज का उद्देश्य केवल अपने कॅरिअर को आगे बढ़ाना नहीं था, बल्कि वह यह भी चाहते थे कि उनके प्रयासों से दूसरों के लिए नए रोजगार और विकास के अवसर भी खुलें। यही सोच और उद्देश्य आगे चलकर कंपनी की पहचान बन गया।

### सिर्फ दस कर्मचारियों से की शुरुआत

एचएचसीआईएल की शुरुआत एक छोटे से उद्यम के रूप में हुई थी, लेकिन समय के साथ यह एक मजबूत और तेजी से बढ़ती कंपनी बन गई। यह यात्रा बिल्कुल आसान नहीं थी। शुरुआत में कंपनी के पास केवल दस कर्मचारी और ५० हजार रुपये की सीमित पूंजी थी। सुरक्षा और सुविधा प्रबंधन के क्षेत्र में पहले से कई बड़ी कंपनियां मौजूद थीं, इसलिए नए ग्राहकों का भरोसा जीतना नीरज तिवारी के लिए एक बड़ी चुनौती थी। मगर लगातार मेहनत, बेहतर सेवाएं और गुणवत्तापूर्ण काम ने धीरे-धीरे उनको अपनी अलग पहचान दिला दी।

### छह साल के भीतर पहुंचे शिखर पर

एचएचसीआईएल में नीरज ने शुरुआत से ही क्वालिटी पर जोर दिया। उन्होंने कम लागत में बेहतर सेवाएं प्रदान करनी शुरू कीं और धीरे-धीरे मार्केट में अपनी मजबूत पहचान बना ली। समय के साथ उन्होंने कंपनी का दायरा भी लगातार बढ़ाया। आज कंपनी कई तरह की सेवाएं देती है, जिनमें सिक्योरिटी सॉल्यूशन, कैश सॉल्यूशन, फैसिलिटी मैनेजमेंट, कॉरपोरेट रिस्क मैनेजमेंट और बैकग्राउंड वेरिफिकेशन जैसी प्रमुख सेवाएं शामिल हैं। वर्तमान में एचएचसीआईएल की मौजूदगी १२ राज्यों में है और कंपनी में लगभग चार हजार से अधिक कर्मचारी कार्यरत हैं। कंपनी अब आईपीओ लाने की तैयारी कर रही है। एक रिपोर्ट के अनुसार, एचएचसीआईएल का लक्ष्य वित्त वर्ष २०२७-२८ तक शेयर बाजार में सूचीबद्ध होना है। कंपनी की उत्कृष्टता का अंदाजा इसी बात से लगाया जा सकता है कि लॉन्च के केवल छह साल बाद ही एचएचसीआईएल को गुजरात की सर्वश्रेष्ठ सुरक्षा एजेंसी का दर्जा मिल गया था। इसी तरह, २०१७ में नीरज तिवारी को 'यंग अचीवर्स ऑफ द ईयर' सम्मान से नवाजा गया।



### युवाओं को सीख

- जब शुरुआत छोटी हो, तो मेहनत ही वह रास्ता है, जिसे दुनिया पहचानती है।
- बड़ी कंपनियां संसाधनों से बनती हैं, पर पहचान विश्वास और गुणवत्ता से ही मिलती है।
- चुनौतियां रास्ता रोकती नहीं, बल्कि यह परखती हैं कि आपका इरादा कितना सच्चा है।
- सीमित पूंजी आपके कदम रोक सकती है, लेकिन दृष्टि और साहस आपकी दिशा तय करते हैं।
- सफलता वहीं जन्म लेती है, जहां डर खत्म होता है और पहले कदम की हिम्मत शुरू होती है।


# 'या' गोलंदाजांनी २०२५ मध्ये घेतले सर्वाधिक बळी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वर्ष २०२५ मधील सर्व प्रमुख देशांचे एकदिवसीय सामने आता संपले आहेत. भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी हे वर्ष सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे ठरले. कारण भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीवर आपले नाव कोरले.

भारताने या वर्षात एकूण १४ एकदिवसीय सामने खेळले. ज्यापैकी ११ सामन्यांत विजय मिळाला. तर केवळ ३ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला. या यशस्वी वर्षानंतर २०२५ मध्ये एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी घेणाऱ्या अव्वल गोलंदाजांचा आढावा घेऊया.

### मॅट हेन्री




न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्री यावर्षीचा सर्वांत यशस्वी गोलंदाज ठरला आहे. त्याने १३ सामन्यांत अवघ्या १८.५८ च्या सरासरीने सर्वाधिक ३१ बळी टिपले. ५.१६ च्या इकोनॉमी रेटसह त्याने फलंदाजांना जखडून ठेवले. विशेष म्हणजे या वर्षात त्याने तीन वेळा डावात ४ बळी आणि एकदा ५ बळी घेण्याची किमया साधली. त्याच्या नावावर आता एकूण १७२ एकदिवसीय बळी जमा झाले आहेत.

### आदिल रशीद



इंग्लंडचा लेगस्पिनर आदिल रशीदने २०२५ मध्ये १५ सामन्यांत २३.६३ च्या सरासरीने ३० बळी मिळविले. ६३ धावांत ४ बळी ही त्याची या वर्षातील सर्वोत्तम कामगिरी ठरली. रशीदच्या खात्यात आता १५८ सामन्यांत एकूण २३५ बळी आहेत.

### जेडन सील्स



वेस्ट इंडिजचा जेडन सील्सने यावर्षी आपल्या गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले. त्याने १२ सामन्यांत १८.१४ च्या उत्कृष्ट सरासरीने २७ बळी घेतले. १८ धावांत ६ बळी ही त्याची कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी याच वर्षात नोंदविली गेली. त्याने आतापर्यंत २९ सामन्यांत ४० बळी मिळविले आहेत.

### मिचेल सँटनर



न्यूझीलंडचा फिरकीपटू मिचेल सँटनरसाठी देखील २०२५ हे वर्ष फलदायी ठरले. त्याने १७ सामन्यांत २५ बळी घेतले. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये सँटनरने ९ बळी मिळवून स्पर्धेत संयुक्तपणे दुसरे स्थान पटकावले होते. या स्पर्धेतील त्याचा ४.०८ चा इकोनॉमी रेट अत्यंत प्रभावी ठरला.

### हर्षित राणा



भारतीय गोलंदाजांचा विचार केला तर युवा वेगवान गोलंदाज हर्षित राणा याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. २०२५ मध्ये भारताकडून सर्वाधिक बळी घेण्याचा मान त्याने मिळविला आहे. हर्षितने ११ सामन्यांत २५.५५ च्या सरासरीने एकूण २० बळी घेतले. ३९ धावांत ४ बळी ही त्याची या वर्षातील सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे.





# केस स्टडी : ५० रुपयांमुळे २२ हजार कोटींची बायजूज रसातळाला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वांत मोठ्या शैक्षणिक कंपन्यांपैकी एक असलेली 'बायजूज' अवघ्या ५० रुपयांच्या जाहिरातीमुळे रसातळाला गेली. एकेकाळी २२ हजार कोटी रुपये मूल्य असलेली ही कंपनी मूळ उद्देशापासून दुरावल्याने आणि अतिजाहिरातबाजीच्या आहारी गेल्याने डबघाईस आली. ही केस स्टडी मूळ मूल्यांपासून भटकण्याचे परिणाम आणि धोरणात्मक चुकांचा परिणाम दर्शवते.

### बायजूजचा उदय

२०११ मध्ये बायजू रवींद्रन यांनी स्थापन केलेली 'बायजूज' ही ऑनलाइन शिक्षण कंपनी सुरूवातीला दर्जेदार शिक्षणासाठी ओळखली गेली. २०१५ पर्यंत पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी तोंडी जाहिरात करून कंपनीला यश मिळवून दिले. ऑरगॅनिक वाढीमुळे कंपनीने विश्वासार्हता आणि गुणवत्ता कमावली. कोणत्याही चमकदार जाहिराती किंवा सेलिब्रिटींच्या समावेशाशिवाय 'बायजूज'ने बाजारात स्थान मिळविले. अभ्यासक्रमाची किंमत (२५ ते ३० हजार रुपये) आणि ग्राहक अधिग्रहण खर्च (सुमारे ५ हजार ५०० रुपये) यामुळे कंपनीला नफा मिळत होता.

कशी झाली चूक?

### जाहिरातबाजीचा अतिरेक

- २०१५ नंतर बायजूजने ५० रुपयांच्या किरकोळ पेड मार्केटिंगपासून सुरूवात केली. यामुळे ग्राहकांची संख्या वाढली. पण त्याने कंपनीला जाहिरातबाजीच्या भूलभुलैयात ढकलले.
- आयपीएल स्पॉन्सरशिप, सेलिब्रिटी एंडोर्समेंट्स आणि टीव्हीवरील महागड्या जाहिरातींमुळे २०२१२ पर्यंत मार्केटिंग खर्च २ हजार कोटींवर पोहोचला.
- याच वर्षी कंपनीचा महसूल २ हजार २८० कोटी रुपये होता. म्हणजेच प्रत्येक १०० रुपये कमाईसाठी ८८ रुपये जाहिरातींवर खर्च झाले. ही वाढ शाश्वत नव्हती.

### मूळ उद्देशापासून दुरावणे

- बायजूजने दर्जेदार शिक्षणाऐवजी गुंतवणूकदारांचे मूल्यांकन आणि अधिक गुंतवणूक मिळविण्यावर लक्ष केंद्रित केले.
- ग्राहक अधिग्रहण खर्च वाढत गेला. अभ्यासक्रमाच्या किमती स्थिर राहिल्या. यामुळे नफ्याचे मार्जिन कमी झाले.
- कंपनीने शिक्षणापेक्षा ब्रँड इमेज आणि बाजारपेठेतील वर्चस्वावर जास्त भर दिला. ज्यामुळे विश्वासार्हता गमावली.

### पतनाची कारणे

**आर्थिक अस्थिरता :** जाहिरातबाजीवर अवलंबित्व वाढल्याने आणि निधी मंदावल्याने कंपनीचे मॉडेल कोलमडले.

**तपासणी आणि कर्ज :** व्यवहारांवरील तपासणी आणि कर्जाचा बोजा वाढला. बायजूजने आक्रमक अधिग्रहण (जसे की व्हाइटहॅट ज्युनियर, आकाश इन्स्टिट्यूट) केले. मात्र त्यांना एकत्रित करण्यात अपयश आले.

**ऑरगॅनिक विश्वास नष्ट :** सुरूवातीच्या ऑरगॅनिक वाढीऐवजी सशुल्क मार्केटिंगवर अवलंबित्वामुळे पालक आणि विद्यार्थ्यांचा विश्वास कमी झाला. २०२२-२३ मध्ये कंपनीच्या आर्थिक अहवालात अनियमितता आढळली. मूल्यांकन २२ हजार कोटींवरून खाली आले. सध्या कंपनी कर्ज आणि कायदेशीर समस्यांशी झुंजत आहे.

### शिकवण

**मूळ उद्देश महत्त्वाचा :** शिक्षणासारख्या क्षेत्रात गुणवत्ता आणि विश्वासार्हता हीच खरी ताकद आहे.

**शाश्वत वाढ :** ऑरगॅनिक वाढ मंद असली, तरी ती टिकाऊ असते. जाहिरातबाजीवर अवलंबित्व दीर्घकाळ टिकत नाही.

**आर्थिक शिस्त :** मार्केटिंग खर्च हा उत्पादनाच्या मूल्यापेक्षा जास्त नसावा.

**ग्राहक केंद्रित दृष्टिकोन :** गुंतवणूकदारांपेक्षा ग्राहकांचा विश्वास टिकविणे महत्त्वाचे आहे.

बायजूजच्या पतनाची सुरूवात ५० रुपयांच्या जाहिरातीपासून झाली असली, तरी मूळ कारण होते मूळ उद्देशापासून दुरावणे आणि अतिव्यय. ही कहाणी प्रत्येक उद्योजकाला शाश्वत धोरण आणि विश्वासार्हतेचे महत्त्व शिकविते.

# गोरे दिसण्यासाठी दीपिकाने केली ट्रीटमेंट?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यु-ट्यूबर ध्रुव राठीने अलीकडेच रणवीर सिंगच्या 'धुरंधर' चित्रपटावर जोरदार टीका केली होती. चित्रपटाला प्रोपोगंडा असल्याचे म्हटले होते. आता त्याने अभिनेत्री दीपिका पदुकोण हिने गोरे दिसण्यासाठी स्किन लाइटनिंग ट्रीटमेंट केल्याचा दावा केला आहे. ध्रुव राठीने यु-ट्यूब चॅनेलवर 'द फेक ब्यूटी ऑफ बॉलिवूड सेलिब्रिटीज' या नावाने नवा व्हिडिओ अपलोड केला आहे. या व्हिडिओमध्ये त्याने दीपिका पदुकोणसह काजोल, बिपाशा बसू, प्रियांका चोप्रा यांसारख्या अनेक अभिनेत्रींनी कॉस्मेटिक सर्जरी केल्याचे म्हटले आहे.

व्हिडिओमध्ये ध्रुव म्हणतो, की ज्याचे सौंदर्य तुम्ही ईश्वराची देणगी मानता ती खरोखर डॉक्टरांची देणगी बनलेली आहे. त्यानंतर तो नोज जॉब, लिप फिलर्स, फॅट रिमूव्हल, जॉ लाईन ऑग्मेंटेशन, फेस लिफ्ट, बोटॉक्स इत्यादी कॉस्मेटिक प्रोसिजरची माहिती देतो. काही अभिनेत्रींच्या करिअरच्या सुरूवातीस त्यांचा रंग सावळा होता. पण आता त्या गोऱ्या दिसतात. काही अभिनेत्री स्किन व्हाइटनिंग क्रीमच्या जाहिराती करतात. परंतु ग्लूटाथिओन इंजेक्शन स्किन लाइटनिंगसाठी अभिनेत्रींमध्ये लोकप्रिय आहे.

हा व्हिडिओ गुरुवार, दि. २५ डिसेंबर रोजी यु-ट्यूबवर व्हायरल झाला. दीपिकाचे फॅन्स लगेचच तिचा बचाव करताना म्हणाले, की लाइटिंग आणि एडिटिंगमुळे रंग हलका दिसतो. मुला वाटत नाही, की तिने ट्रीटमेंट केली आहे. काही फॅन्सनी तिच्या बालपणीचे फोटो दाखवत म्हटले, की दीपिका मूलतः मीडियम स्किन टोनची होती आणि २००० च्या दशकातील टॅनिंग ट्रेंड फॉलो करत होती, जसे ऐश्वर्याने 'धूम २' साठी केले होते.


वैज्ञानिकांचे बालपण

# 'नोबेल'ने सन्मानित अल्बर्ट आईन्स्टाईन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुलांनो, मला माहीत आहे, की तुम्हाला वैज्ञानिकांच्या आयुष्याबद्दल कमालीचे कुतूहल आहे. त्यांचे बालपण जाणून घेण्यासाठी तुम्ही नेहमीच उत्सुक असतात. आपण 'नोबेल' पुरस्काराने सन्मानित अल्बर्ट आईन्स्टाईनच्या बालपणीच्या काही गमतीशीर गोष्टी जाणून घ्यायच्या का?

हर्मन आणि पोलीनच्या घरात १४ मार्च १८७९ मध्ये एक बालक जन्माला आला. जन्मतः अल्बर्ट आईन्स्टाईन अगदीच असामान्य होता. त्याचे डोके शरीराच्या आकारापेक्षा खूप मोठे होते, म्हणून त्याला काहीतरी व्यंग असेल का? अशी भीती त्याच्या आई-वडिलांना वाटत असे. म्हणून त्याचे आई-वडील सतत चिंतेत असायचे. परंतु हळूहळू त्याचा डोक्याचा आकार कमी होऊ लागला. तो बरेच दिवस काहीच बोलत नसे. म्हणून माझा मुलगा बोलेल का? असा प्रश्न नेहमी त्याच्या आईला पडत असे. पण एक दिवस जेवत असताना तो अचानक 'सूप खूप गरम आहे' असे वाक्य उच्चारला आणि सगळ्यांना खूप-खूप आनंद झाला.



लहानपणी आईन्स्टाईनला आपल्या वयाच्या मुलांसोबत खेळायला अजिबात आवडत नसे. त्याचे स्वतःचे असे वेगळेच जग होते. तो तुमच्यासारखाच झाडे, पाणी आणि ब्रह्मांडाबद्दल तासन्तास विचार करीत असे. त्याला हे जग कसे चालत असेल? असा प्रश्न नेहमी पडत असे. त्याची अवकाशाबद्दलची रुची लक्षात घेऊन वडिलांनी त्याला एक मॅग्नेटीक कंपास दिला. तेव्हापासून त्याची विज्ञानातील रुची अधिकच दृढ झाली. त्याला बोलण्यात अडचण येत असल्यामुळे तो शाळेता खूप उशिरा गेला. शाळा त्याला जेलसारखी वाटत असे आणि अजिबात आवडत नसे. तो शिक्षकांना नेहमी वेगवेगळे प्रश्न विचारून भंडावून सोडत असे. त्यामुळे शिक्षक त्याला मंदबुद्धीचा संबोधत असत. आईन्स्टाईनच्या मनात स्वतःबद्दल एक न्यूनगंड होता. एक दिवस त्याने थेट शिक्षकालाच प्रश्न केला, की मी माझ्या बुद्धीचा विकास कसा करू शकेल? यावर शिक्षकांनी त्याला समजावले, की 'अभ्यास हा सफलतेचा मूळमंत्र आहे.' शिक्षकाचे हे वाक्य त्याच्या मनावर खोलवर कोरले गेले. तेव्हापासून त्याला अभ्यास आवडला नाही, तरी तो सतत पुस्तक घेऊन बसायचा व काहीतरी वाचायचा. परिणामी गणितासारख्या जटील विषयात त्याची रुची वाढत गेली आणि तो अधिकच पुस्तकात रुची घेऊ लागला.

मुलांनो, आईन्स्टाईन जरी एवढा मोठा वैज्ञानिक होता, तरी तो मनाने अतिशय साधा व प्रांजळ होता. त्याची आर्थिक स्थिती अतिशय गरिबीची होती. काटकसर ही त्याच्या आयुष्याची गरज होती. एकदा खूप पाऊस पडत होता. आईन्स्टाईन स्वतःची हॅट बगलेत पकडून घाई-घाईने घरी जात होता. तो पावसात पूर्ण ओला झाला. पण हॅट डोक्यावर ठेवत नव्हता म्हणून रस्त्यावरील एका व्यक्तीने आश्चर्यचकित होऊन त्याला विचारले, की 'तू पावसात ओला का होत आहेस?' आईन्स्टाईनच तो. एका क्षणाचाही विलंब न करता म्हणाला, की डोके ओले झाले तर ते सुकून जाईल. परंतु हॅट ओली झाली तर खराब होईल आणि नवीन हॅट घ्यायला माझ्याकडे पैसे, वेळ दोन्हीही नाही. होता ना अजब आईन्स्टाईन अगदी तुमच्यासारखा. आईन्स्टाईनच्या या उदाहरणावरून साधेपणा आणि सरळपणा हा यशस्वी लोकांच्या आयुष्याचा मूळ सिद्धांत म्हटले तर वावगे ठरू नये. आपण आणखी काही आईन्स्टाईनचे मजेदार किस्से पुढील भागात वाचू...

**- मंगल नागरे-देशमुख**
**जि. प. शाळा, कलाली**
**(ता. अमळनेर, जि. जळगाव)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## मिस पुणे सौंदर्य स्पर्धा २०२५- २६

# ऋतुजा चौधरीने पटकावला सेकंड रनर- अपचा बहुमान

## अमळनेरच्या शिरपेचात रोवला मानाचा तुरा




ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील अमळगाव येथील डॉ. पंकज सुरेश चौधरी यांची कन्या ऋतुजा चौधरी (वय १९) हिने शुक्रवार, दि. २६ रोजी पार पडलेल्या प्रतिष्ठित मिस पुणे २०२५- २६ सौंदर्य स्पर्धेत सेकंड रनर-अप स्थान पटकावले आहे. अमळनेरच्या शिरपेचात तीने मानाचा तुरा रोवला आहे. या सौंदर्यस्पर्धेत एकूण १२ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. ऋतुजाने आपल्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने, बुद्धिमत्तेने व सोज्वळ व्यक्तिमत्त्वाने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. सेकंड रनर-अप ठरण्याचा बहुमान मिळवला. तसेच तिने मिस पुणे पेजंट हा मानाचा किताबही पटकावला आहे. ऋतुजा हिच्या कर्तृत्वाची दखल राज्यभर घेतली गेली आहे. तिच्या कामगिरीमुळे कुटुंबीयांसह अमळनेरसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तिच्या मेहनत, चिकाटी व समर्पणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. ऋतुजाने यापूर्वी झारा (झारा) या आंतरराष्ट्रीय ब्रँडसाठी रन-वे मॉडेल म्हणून काम केले आहे. तसेच यू- ट्यूबवरील स्टार म्युझिक या ब्रँडअंतर्गत प्रदर्शित झालेल्या 'भूल जावा' या गाण्यातही तिने अभिनय केला आहे. तिचा हा प्रवास मॉडेलिंग व मनोरंजन क्षेत्रातील उज्ज्वल भविष्याची नांदी ठरत आहे. तिच्या या यशाबद्दल माजी आमदार शिरीषदादा चौधरी, समस्त कल्याणकारी बहुद्देशीय संस्था (अमळगाव), तसेच महाराष्ट्र प्रदेश तेली महासंघ (अमळनेर) यांनी अभिनंदन केले आहे.




(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# बस उलट दिशेने लागत असल्याने अमळनेरला प्रवाशांची तारांबळ

## आगार व्यवस्थापकांचे दुर्लक्ष; उपाययोजनेची मागणी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील बस स्थानकात बस गाड्या उलट दिशेने लावता येतात. परिणामी प्रवाशांची बस शोधतांना तारांबळ होते. त्यामुळे आगार व्यवस्थापकांनी गांभिर्याने लक्ष देऊन याबाबत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवांशानी केली आहे.

बस स्थानकात बस गाड्या शिस्तबद्ध पद्धतीने लावण्याबाबत कोणतेही नियोजन नाही. सर्वसाधारणपणे बस फलाटावर लावताना प्रवाशांना फलक दिसतील अशा पद्धतीने लावल्या जातात. मात्र, प्रवाशांकडे पाठ असलेल्या स्थितीत अर्थातच उलट दिशेने बस लावल्या जातात. त्याही नियोजीत फलाटावर न लागता कोणत्याही फलाटावर लागत असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. हा प्रकार सर्रास सुरू असल्याने अनेक प्रवाशांना संबंधित बसमधून प्रवास करण्याची सुविधाच मिळत नसल्याचेही चित्र आहे. अनेक बस गाड्यांना फलकच लावले जात नसल्याचेही दिसून येते.

याच कारणामुळे गेल्या चार दिवसांपूर्वी बसमध्ये जागा मिळवण्याच्या धावपळीत दोन शालेय विद्यार्थिनी जखमी झाल्या होत्या. मात्र, व्यवस्थापनाने याकडे लक्ष दिलेले नाही. त्यातच बसस्थानकांची अत्यंत दयनीय झाली आहे. आगारात पडलेले खड्डे, धुळीमुळे प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते.

### हृदयनाथ मोरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : येथील सामाजिक कार्यकर्ते हृदयनाथ मोरे यांना भारतीय दलित साहित्य अकादमीतर्फे दिला जाणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप पुरस्कार २०२५ नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. फुले, शाहू, आंबेडकर विचारधारेच्या प्रचार आणि प्रसार राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये करणाऱ्या समाजसेवकांना हा पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल हृदयनाथ मोरे यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# सुका मेव्याच्या किंमती भिडल्या गगनाला

## मेथीचे लाडू बनविण्यासाठी गृहिणींचे बजेट बिघडले

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : हिवाळ्याची चाहूल लागताच महिलांना कुटुंबीयांच्या आरोग्य संवर्धनासाठी पोषक ठरणारे मेथीचे लाडू बनविण्याचे वेध लागतात. मात्र, यंदा हेच मेथीचे लाडू गृहिणींसाठी चांगलेच महाग ठरले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत बिबव्याची गोडंबी, खारीक, खोबरे यांसह इतर सुकामेव्याच्या किमतीत मोठी वाढ झाल्याने मेथीच्या लाडूंच्या बजेटवर मोठा परिणाम झाला आहे. प्रतिकिलो लाडू तयार करण्यासाठी यंदा दीड ते दोन हजार रुपयांपर्यंत पोहोचला आहे, असे काही व्यापाऱ्यांनी सांगितले.

मेथीचे लाडू हे हिवाळ्यातील एक महत्त्वाचे व पौष्टिक पदार्थ मानले जातात. काजू, बदाम, पिस्ता, अंजीर, गोडंबी, खारीक, खोबरे, गूळ, खसखस, डिंक आणि मेथी या साहित्याचा वापर करून हे लाडू तयार केले जातात. काही गृहिणी गोड्या तेलात तर काही शुद्ध तुपात लाडू बनवितात. घरातील प्रत्येक सदस्याने रोज एक लाडू खावा, या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर लाडू तयार करण्याकडे महिलांचा कल असतो. यंदा सुकामेव्याच्या दरात सरासरी २० टक्क्यांनी वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. काजू व बदाम ९०० ते १ हजार रुपये प्रतिकिलो, पिस्ता १५०० ते २ हजार रुपये प्रतिकिलो दराने विकला जात आहे. गूळ ६० ते ७० रुपये किलो दराने उपलब्ध आहे. मात्र, खोबऱ्याच्या दरात वाढ झाली असून गेल्यावर्षी १५० ते २०० रुपये असलेले दर यंदा थेट ३२० ते ४०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. खारीक व गोडंबीचे दरही वाढले आहेत. मेथीचे दर सध्या ८० ते ९० रुपये प्रतिकिलो दराने मेथी उपलब्ध आहे.

### बाजारात अपेक्षित गर्दी नाही

दरवाढीमुळे अनेक ग्राहक आवश्यक तेवढाच सुकामेवा खरेदी करत असल्याने सध्या बाजारात अपेक्षित गर्दी दिसून येत नाही. मात्र, पुढील आठवड्यात खरेदीत वाढ होण्याची शक्यता व्यापारी व्यक्त करत आहेत.

# यशासाठी वाचनाचे तंत्र आत्मसात करा

## गुलशन बेलदार; प्रताप महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन





ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी पदवी स्तरावर परीक्षेची तयारी करणे आवश्यक आहे. केवळ रिल्स पाहून करिअर होत नाही. व्यवहारास अद्ययावत कसे करता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. रोज दोन तास परीक्षेची तयारी करावी. विविध विषयाच्या पुस्तकांचे अध्ययन तंत्र आत्मसात केल्यास स्पर्धा परीक्षेत हमखास यश मिळते, असे प्रतिपादन पुणे येथील इग्नाईट अकॅडेमीचे गुलशन बेलदार यांनी केले.

येथील खानदेश शिक्षण मंडळ संचालित प्रताप महाविद्यालयांतर्गत करिअर कौन्सिलिंग सेंटरमध्ये शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी झालेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सप्ताह कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव अध्यक्षस्थानी होते. अंतर्गत गुणवत्ता अभिवचन कक्ष तथा राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचे समन्वयक डॉ. मुकेश भोळे, करिअर कौन्सिलिंग सेंटरचे प्रमुख डॉ. विजय तुंटे, स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे संयोजक प्रा. विजय साळुंखे व्यासपीठावर उपस्थित होते.

श्री. बेलदार पुढे म्हणाले, की संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग या परीक्षांचे स्वरूप आणि अभ्यास करण्याचे तंत्र समजावून घेणे महत्वाचे आहे. आपल्या क्षमतेनुसार पदाची तयारी करावी. तेव्हा कौशल्याच्या आधारावर परीक्षा उत्तीर्ण करता येतात. आपले कौशल्य कोणत्या पदासाठी उपयुक्त ठरू शकेल हेही तपासावे. त्यानंतर त्याचे सखोल अध्ययन करावे.

प्राचार्य डॉ. जाधव म्हणाले, की आयुष्याचे गणित नीटपणे सोडविणारे पुढे जातात. अगोदर कष्ट घ्यावे लागतात. नंतरच आपणास यश मिळते. माणसे ही जगात कर्तृत्वाने सुंदर असतात. म्हणून स्पर्धा परीक्षा हे कर्तृत्व गाजविणारे मंच आहे.

प्रारंभी सरस्वती देवी, पूज्य साने गुरुजी, श्रीमंत दानशूर प्रताप शेठजी यांच्या प्रतिमांचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. करिअर कौन्सिलिंग सेंटरचे प्रमुख डॉ. विजय तुंटे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जितेंद्र पाटील यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ. जाधव यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. डॉ. रवी बाळस्कर यांनी रुसा समन्वयक डॉ. मुकेश भोळे यांचे स्वागत केले.

डॉ. विवेक बडगुजर, डॉ. हेमंत पवार, डॉ. बालाजी कांबळे, डॉ. किरण गावित, डॉ. अनिल झळके, डॉ. प्रियांका पाटील, डॉ. राखी घरटे, प्रा. अमोल अहिरे, डॉ. आकाश गव्हाणे, प्रा. भिका पावरा, प्रा. उमेश येवले, प्रा. सचिन आवटे, प्रा. दिलीप तडवी, प्रा. हिमांशू पाटील, प्रा. हिमांशू गोसावी यांच्यासह करियर कौन्सिलिंग सेंटरचे दिलीप शिरसाट, पराग पाटील, नंदूसिंग पाटील, विशाल अहिरे, अतुल धनगर, दितेश चिंचोरे, भूषण चौधरी, आफ्रिन पठाण, कल्पेश पाटील आदी उपस्थित होते.

प्रा. विजय साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ज्ञानेश्वर मराठे यांनी आभार मानले. प्रा. वृषाली वाकडे, प्रा. रोहन गायकवाड, प्रा. पुष्पा पाटील, अक्षय सोनार, प्रा. उमेश येवले आदींनी सहकार्य केले.

# थंडीच्या बचावासाठी गरजूंना ब्लँकेटचे वाटप

## जय हिंद व्यायामशाळा, प्रतापआबा मित्र परिवाराचा उपक्रम

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : राजे शिवाजी मित्र मंडळ, जय हिंद व्यायाम शाळा व प्रतापआबा मित्र परिवारातर्फे शहरातील निराधार व गोरगरिबांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. दरवर्षी हिवाळ्यात हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतो. विविध भागात सुमारे ४० ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. माजी नगरसेवक प्रताप शिंपी, आबा बबलू पाटील यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी जीवन पवार, गिरीश पाटील, रुपेश धोबी, सोनू पाटील, गणेश पाटील, सागर शिंपी, सुरज शिंपी व पवन शिंपी उपस्थित होते. समाजसेवा करणे हा आमचा छंद आहे. या भावनेतून दरवर्षी सातत्याने असे उपक्रम राबविले जात असल्याचे प्रताप शिंपी यांनी सांगितले. थंडीच्या बचावापासून ब्लँकेट उपलब्ध झाल्याने गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

# ॲड. ललिता पाटील स्कूलचे स्नेहसंमेलन

## " मै भी कृष्ण " नृत्य नाटिकेने जिंकली उपस्थितांची मने



ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : येथील ॲड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूल संस्काराचे मोल रुजविण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. या पार्श्वभुमीवर यावर्षी शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात श्रीकृष्ण जीवनावर आधारित ' मै भी कृष्ण ' यावर सादरीकरण झाले. यातून सामाजिक जागृतीचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सौ. ललिताताई पाटील, संस्थेचे सचिव प्रा. श्याम पाटील, संचालक पराग पाटील व संचालिका सौ. देवेश्री पाटील, लताई आदिमजन संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती डॉ. शुभांगी चव्हाण, डॉ. प्रतिभा मराठे, पालकप्रतिनिधी कमल ओझा आदी उपस्थित होते.

माता सरस्वतींच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार झाला. विविध क्षेत्रात प्रविण्य मिळविलेल्या विध्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. यात बारावी परीक्षेत जिल्ह्यातून तृतीय क्रमांक आलेला विद्यार्थी, आयटीओ परीक्षेत राज्यातून प्रथम येणारे विद्यार्थी, क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, विभागीय, जिल्हा स्तरीय विद्यार्थी, इस्त्रोमध्ये निवड झालेला विद्यार्थी यांचा सहभाग होता. शाळेला 'गोल्डन स्कूल ऑफ द इयर अवॉर्ड' मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ . नीरज चव्हाण यांचा विशेष सत्कार करण्यात आला. ॲड. सौ. ललिताताई पाटील यांनी विध्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. शाळेला मिळालेल्या अवॉर्ड बद्दल प्राचार्य डॉ. नीरज चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. पालक प्रतिनिधीकमल ओझा यांनी सांगितले, की शाळा प्रगतीपथावर आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधला जात आहे. याचे फलीत म्हणजे फलित विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळविलेले यश होय. मी ज्या अपेक्षेने माझ्या मुलांना दाखल केले होते त्या अपेक्षा पूर्ण झाल्या आहेत.

स्नेहसंमेलनत श्रीकृष्ण जीवनाची आजच्या युगाशी सांगड घालण्यात आली. प्रत्येक परिस्थितीत श्रीकृष्णासारखे आचरण करून योग्य निर्णय घेण्याची क्षमता वाढवावी. आपल्यातला कृष्ण कसा शोधावा याचे नृत्यनाटिकेद्वारे विध्यार्थ्यांनी सादरीकरण केले. नर्सरी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

विद्यार्थ्यांना सादर केलेल्या राधा- कृष्णच्या रासलीलाद्वारे महिला सक्ष्मीकारणाचे सादरीकरण झाले. कंस वधाने अत्याचारावर सत्याचा विजय दाखविण्यात आला. श्रीकृष्णांच्य जीवनावर आधारित प्रसंगांनी सारेच भारावले होते. प्राचार्य डॉ. नीरज चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. वरिष्ठ शिक्षक विलास पाटील व कु. मुस्कान डिंगरे यांनी सूत्रसंचालन केले. शिक्षक जावेद पिंजारी यांनी आभार मानले. शिक्षिका राजकमल कोळी व सोनाली कोळी यांनी सहकार्य केले.




# शाकंभरी नवरात्रोत्सव : समृद्धीचा आणि पोषणाचा गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



शाकंभरी नवरात्रोत्सव हा हिंदू धर्मातील विशेष आणि ऐतिहासिक धार्मिक उत्सव आहे. जो देवी शाकंभरी यांना समर्पित आहे. पोषण, संपन्नता आणि जीवनदायी शक्तीचे प्रतीक. या नवरात्राचे नाव ‘ शाकंभीरि ’ यावरून आले आहे. ‘ शाका ’ म्हणजे भाज्या/शाकांची देवी आणि ‘ अंबरी ’ म्हणजे वहणारी/धारणा करणारी म्हणजेच भोजनाचा आणि अन्नाचा स्त्रोत. या नवरात्राचा उत्सव तमाम भारतात विविध प्रदेशांत कर्नाटक, महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश इत्यादी भागांत भक्ती व उत्साहाने साजरा केला जातो.

## तारीख आणि कालावधी (२०२५-२६)

शाकंभरी नवरात्री येथे हिंदू पंचांगानुसार पौष शुक्ल पक्षातील अष्टमी ते पौर्णिमा या काळात साजरी होते. जे साधारण ८९ दिवसांचे असते.

**सुरूवात :** २८ डिसेंबर २०२५ (पौष शुक्ल अष्टमी/ बनदा अष्टमी)
**समाप्ती :** ०३ जानेवारी २०२६ (पौष शुक्ल पौर्णिमा/शाकंभरी पौर्णिमा) या कालावधीत भक्त देवीला पूजा, आरती, व्रत आणि धार्मिक कार्यक्रमांसह श्रद्धापूर्वक सन्मान करतात. या उत्सवाचे स्वरूप पारंपरिक नवरात्रोत्सवाप्रमाणे नव्हे, तर शाकाभोक्तीकडे आणि प्रकृती पूजनाकडे केंद्रित आहे.

## देवी शाकंभरी कथा आणि धार्मिक महत्त्व

देवी शाकंभरी हे भगवतीचा एक महत्त्वाचा अवतार आहे. ज्यांनी प्राचीन काळात भूकेमुळे आणि अकालामुळे त्रस्त मानवतेची रक्षा करण्यासाठी स्वतःच्या शरीरावरून भाज्या, फळे, हिरव्या पालेभाज्या आणि अन्न निर्माण करून लोकांना जीवनदान दिले, अशी पुराणकथा आहे. या रूपामध्ये देवीला प्रकृतीच्या समृद्धीची, अन्नाच्या उपलब्धतेची आणि जगाला पोषण देणाऱ्या शक्तीची मूर्ती मानले जाते.

## उत्सवाचे धार्मिक आणि सामाजिक महत्त्व

शाकंभरी नवरात्रोत्सव हे केवळ धार्मिक व्रत वा पूजा नव्हे. मानवी जीवनातील पोषण, स्वास्थ्य आणि सामाजिक समृद्धीचा हा उत्सव आहे. शाकंभरी देवीची पूजा अन्न, पाण्याची, शेतीची आणि पर्यावरणीय संतुलनाची महती अधोरेखित करते. या काळात भक्त विविध भाज्या, हिरव्या पालेभाज्या, फळे देवीला नैवेद्यादाखल अर्पण करतात. ज्यामुळे प्रकृतीची कृतज्ञता आणि संतुलित आहाराचा संदेश प्रसारित होतो. आरोग्य माहिती तज्ज्ञही या काळात आरोग्यदायी व संतुलित आहाराचे महत्त्व सांगतात. त्यामुळे हा उत्सव व्यक्ती आणि समाजासाठी स्वास्थ्याचे आणि आधुनिक पोषणशास्त्राचे प्रतीक बनतो.

## पूजा विधी आणि व्रत

शाकंभरी नवरात्रीदरम्यान भक्त सकाळी नियमित पूजा, मंत्रोच्चारण, आरती आणि उपासनेत सहभागी होतात.

## मुख्य पूजा विधींची काही वैशिष्ट्ये

फुले, फळे, हिरव्या पालेभाज्या व विविध भाज्यांचे नैवेद्य देवीला अर्पण केले जातात. व्रत असलेल्या भक्तांनी साधा आणि शाकाहारी आहार पाळणे. मंत्र, स्तोत्र आणि देवी गाथा यांचे पाठ आणि आरती यांचा विधी करावा. काही स्थानिक परंपरांमध्ये जौच्या बियाण्यांपासून घरात रोपे लावण्याची प्रथा देखील आहे.

# सूर्यमालेतील तप्त गोळा ‘ सूर्य ’


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सूर्य हा तारा आपल्या सूर्यमालेच्या केंद्रस्थानी आहे. पृथ्वी व सूर्यमालेतील इतर पदार्थ (ग्रह, उल्का, लघुग्रह, धूमकेतू आणि धूळ) हे सर्व सूर्याभोवती प्रदक्षिणा घालतात. हा सूर्यमालेतील एक तप्त गोळा आहे. सूर्यमालेतील एकूण वस्तुमानापैकी ९९ टक्क्यांपेक्षा जास्त वस्तुमान एकट्या सूर्यामध्ये आहे. सूर्यापासून उत्पन्न होणारी ऊर्जा सूर्यकिरणांच्या स्वरूपात बाहेर पडते व प्रकाश संश्लेषणाच्याद्वारे पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टीला आधार देते आणि पृथ्वीच्या वातावरणामध्ये व हवामानामध्ये बदल घडवते.

सूर्याच्या एकूण वस्तुमानापैकी सुमारे ७४ टक्के हायड्रोजन, २५ टक्के हेलियम व उर्वरित वस्तुमान हे अन्य जड मूलद्रव्यांपासून बनलेले आहे. सूर्याचे सध्याचे वय हे ४६० कोटी वर्षे इतके आहे. तो त्याच्या आयुष्यमानाच्या मध्यावर आहे. सूर्याच्या गाभ्यामधील हायड्रोजन अणू-संमीलन प्रक्रियेद्वारे हेलियममध्ये परिवर्तीत होत असतो. दर सेकंदाला ४ दशलक्ष टन वस्तुमान हे सूर्याच्या गाभ्यामध्ये ऊर्जेत परिवर्तीत होते. तसेच न्यूट्रिनो कण आणि सौरकिरणोत्सर्ग हेसुद्धा तयार होतात. ५०० कोटी वर्षांनी सूर्य एका राक्षसी ताऱ्यामध्ये रूपांतरित होईल. त्यानंतर प्लॅनेटरी नेब्यूला तयार होईल व श्वेत बटू ही शेवटची अवस्था असेल.

सूर्य हा एक चुंबकीय सक्रिय तारा आहे. सूर्याला स्वतःचे प्रखर चुंबकीय क्षेत्र आहे. हे क्षेत्र दर वर्षी बदलते व दर अकरा वर्षांनी त्याची दिशा उलट होते. सूर्याच्या बदलत्या चुंबकीय क्षेत्रामुळे सूर्याच्या पृष्ठभागावर सौरडाग व सौरज्वाला तयार होतात. तसेच सौरवातामध्ये बदल घडतात. सूर्यावरील या घडामोडींमुळे रेडिओ लहरींचे दळणवळण व विद्युतवहनामध्ये व्यत्यय निर्माण होतात. पृथ्वीच्या वातावरणात मध्यम ते अति उंचीवर घडणारे आणि चुंबकीय ध्रुवांजवळ दिसून येणारे अरोरा हेही याच घडामोडींचा परिणाम आहेत. या सौर घडामोडींचा सूर्यमालेच्या उत्पत्ती व उत्क्रांतीमध्ये फार मोठा वाटा आहे. या घडामोडी पृथ्वीच्या बाह्यवातावरणातही मोठा बदल घडवतात.

पृथ्वीच्या सर्वांत जवळचा तारा या नात्याने शास्त्रज्ञांनी सूर्याचा खूप खोलवर अभ्यास केला असला, तरी बरेच प्रश्न अजून अनुत्तरित आहेत. उदा.- सूर्याच्या पृष्ठभागाचे तापमान ६००० केल्व्हिन आहे, तर वातावरणाचे तापमान काही ठिकाणी एक दशलक्ष केल्व्हिनच्या वर पोहोचते. वास्तविकतः हे उलट असण्याची अपेक्षा आहे. मात्र याचे कोडे अजूनही पूर्णपणे सुटलेले नाही. सौरडागांचे चक्र, सौरवातांची व सौरज्वालांची उत्पत्ती व त्यांची भौतिकी, प्रकाश किरीट व क्रोमोस्फेअर यांच्यामधील चुंबकीय क्रिया-प्रतिक्रिया हे शास्त्रज्ञांच्या संशोधनाचे मुख्य विषय आहेत.



सूर्य हा जी २ व्ही या वर्णपटीय विभागात मोडतो. जी २ म्हणजे त्याच्या पृष्ठभागाचे तापमान जवळपास ५५०० केल्व्हिन आहे. त्याचा रंग पिवळा आहे. त्याच्या वर्णपटामध्ये आयनीभूत व निष्क्रिय धातूंच्या रेषा आहेत. ‘ व्ही ’ म्हणजे सूर्य हा बहुतेक इतर ताऱ्यांसारखा ‘ मेन सिक्वेन्स ’ मधील तारा आहे. सूर्य त्याचे हायड्रोस्टॅटिक संतुलन सांभाळून आहे. त्यामुळे तो प्रसरणही पावत नाही किंवा आकुंचनही पावत नाही. आपल्या आकाशगंगेत १०० दशलक्षापेक्षाही अधिक तारे ‘जी २’ वर्गात मोडतात. लोगॅरिथमिक आकारमान वर्गिकरणावरुन सूर्य आकाशगंगेतील ताऱ्यापेक्षा ८५ टक्के जास्त तेजस्वी आहे. बाकीचे बरेच तारे हे लाल बटू आहेत. सूर्य १००० कोटी वर्षे मेन सिक्वेन्समधील तारा राहील. त्याचे सध्याचे वय हे ताऱ्यांची उत्पत्ती व अणुकेंद्रीय विश्वरचनाशास्त्र यांची संगणकीय मॉडेल्स वापरून जवळजवळ ४५.७ लक्ष इतके निश्चित केले आहे. सूर्य हा आकाशगंगेच्या केंद्रापासून २५,००० ते२८,००० प्रकाशवर्षे दूर आहे. आकाशगंगेच्या केंद्राला प्रदक्षिणा घालत असतो. एक प्रदक्षिणा सुमारे २२.५ ते २५ कोटी वर्षांनी पूर्ण होते. त्याचा प्रदक्षिणेतील वेग सेकंदाला २२० किलोमीटर इतका आहे, म्हणजेच १४०० वर्षांमध्ये तो एक प्रकाशवर्ष अंतर पार करतो. तर एक खगोलशास्त्रीय एकक अंतर ८ दिवसांमध्ये पार करतो.

सूर्य हा तिसऱ्या पिढीमधील तारा आहे. त्याचा जन्म हा जवळच्या एखादया ताऱ्याच्या स्फोटामुळे निर्माण होणाऱ्या प्रघाती तरंगांमुळे झाला आहे. सोने व युरेनियम यासारख्या जड मूलद्रव्यांचा सूर्यमालेतील भरपूर आढळ याला पुष्टी देतो. ही मूलद्रव्ये एक तर ताऱ्याच्या स्फोटावेळी होणाऱ्या आण्विक प्रक्रियांमुळे किंवा द्वितीय पिढीतल्या ताऱ्यामध्ये न्यूट्रॉन कण शोषले जाऊन झालेल्या अणुबदलांमुळे तयार झाली असावीत. सूर्यामध्ये स्फोट होण्याइतके वस्तुमान नाही. त्याऐवजी ४०० ते५०० कोटी वर्षांनी तो लाल राक्षसी ताऱ्याच्या अवस्थेत जाईल. त्याचे हायड्रोजन इंधन संपल्याने बाह्यावरण प्रसरण पावेल. तर केंद्र आकुंचन पावेल व गाभ्याचे तापमान खूपच वाढेल. गाभ्याचे तापमान ३०० कोटी केल्व्हिन इतके झाल्यावर हेलियममध्ये अणू-संमेलन क्रिया सुरू होईल. सूर्याचे बाह्य आवरण प्रसरण पावून त्याचा आकार पृथ्वीच्या कक्षेइतका होईल. सध्याच्या संशोधनानुसार सूर्याने लाल राक्षसी ताऱ्याच्या सुरुवातीलाच वस्तुमान गमावल्यामुळे पृथ्वीची कक्षा सध्याच्या कक्षेपेक्षा दूर जाईल व सूर्याच्या पोटात जाण्यापासून वाचेल. तरी पृथ्वीवरील पाणी व वातावरण उकळून नष्ट होईल. लाल राक्षसी अवस्थेनंतर तीव्र तापमान स्पंदनांमुळे सूर्याचे बाह्य आवरण फेकले जाईल व प्लॅनेटरी नेब्युला तयार होईल. शेवटी सूर्य श्वेत बटूमध्ये रूपांतरित होईल. हा कमी व मध्यम वस्तुमानाच्या ताऱ्यांमधे आढळणारा जीवनक्रम आहे.

सूर्यप्रकाश हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील मुख्य ऊर्जास्रोत आहे. पृथ्वीच्या दर एकक पृष्ठभागावर पडणाऱ्या सौर ऊर्जेला सौर स्थिरांक म्हणतात. सौर स्थिरांकाची किंमत ही स्वच्छ वातावरणात एक ‘ खगोलशास्त्रीय एकक ’ अंतरावर व सूर्य माथ्यावर असताना दर चौरस मीटरला १३७० वॅट्स इतकी आहे. ही ऊर्जा नैसर्गिक तसेच कृत्रिम क्रियांमध्ये वापरली जाते. प्रकाश संश्लेषण या क्रियेत वनस्पती सूर्यप्रकाश शोषून ती ऊर्जा रसायनिक ऊर्जेत परिवर्तित करतात. तर प्रत्यक्ष तापवण्यासाठी किंवा सौरघटांद्वारे ती विद्युतशक्तीमध्ये परिवर्तीत करून वापरता येते. पेट्रोलियम किंवा अन्य जीवाश्म इंधनामध्ये असणारी ऊर्जा ही फार पूर्वीच्या वनस्पतींनी प्रकाश संश्लेषणाद्वारे साठवलेलीच ऊर्जा आहे.

सूर्यप्रकाशात अनेक जीवशास्त्रीय गुणधर्म आहेत. सूर्यापासून निघणाऱ्या अतिनील किरणांमध्ये जंतुनाशक गुणधर्म असतात. त्यामुळे ही किरणे जंतुनाशक म्हणूनही वापरतात. या किरणांमुळे त्वचा जळू शकते. पण हीच किरणे त्वचेला ‘ डी ’ जीवनसत्त्व बनविण्यासाठी आवश्यक असतात. अतिनील किरण ही वातावरणात शोषली जातात. त्यामुळे अक्षांशानुसार या किरणांचे प्रमाण बदलत जाते. ध्रुवप्रदेशात कमी तर विषुववृत्ताजवळ जास्त असते. या फरकामुळे अनेक प्रकारचे जैववैविध्य तसेच मनुष्याच्या त्वचेच्या रंगातही स्थानानुसार फरक आढळतो.

## सूर्याचा गाभा

सूर्याच्या गाभ्याची त्रिज्या सूर्याच्या एकूण त्रिज्येच्या २०-२५ टक्के आहे, असे समजले जाते. गाभ्याची घनता १५० ग्रॅ/सें.मी. (पाण्याच्या १५० पट) आणि तापमान साधारण १.५७ कोटी केल्व्हिन आहे. सोहोने केलेल्या निरीक्षणांवरून सूर्याचा गाभा त्याबाहेर असणाऱ्या प्रारण विभागापेक्षा अधिक वेगाने फिरत असावा, असा अंदाज बांधलेला आहे.

## सूर्याचे चुंबकीय क्षेत्र

सूर्याला स्वतःचे चुंबकीय क्षेत्र आहे. सूर्याचे चुंबकीय क्षेत्र साधारण पट्टीचुंबकाच्या प्रकारचे आहे. पण सूर्य हा वायूंचा गोळा असल्यामुळे त्यात पुढे क्लिष्टता निर्माण होते. सूर्याच्या चुंबकीय रेषा या वायूंमधे अडकल्या आहेत. सामान्य वापरातले उदाहरण बघायचे झाले तर इलॅस्टिक ज्याप्रकारे कापडामधे शिवून अडकवले जाते, साधारण तशाच प्रकारे या चुंबकीय रेषा वायूंमधे अडकल्या असतात. कापड जसे फिरवले जाते तसे इलॅस्टिक फिरते. चुंबकीय क्षेत्राची क्लिष्टताही अशाच प्रकारे निर्माण होते. चुंबकीय रेषा सूर्याच्या पृष्ठभागावरही असतात. जेथे त्या तुटतात तेथे पृष्ठभागाचे तापमान कमी होते. कारण खालच्या भागातून अभिरसणाच्या बुडबुड्यांमधून येणारी ऊर्जा तुटलेल्या चुंबकीय रेषांमुळे अडवली जाते. त्या ठरावीक भागापर्यंत कमी ऊर्जा आल्यामुळे हा भाग तुलना करताना (कॉन्ट्रास्टमुळे) काळपट दिसतो. सूर्याच्या पृष्ठभागाचे सरासरी तापमान ६००० केल्व्हिन असते. तर या काळ्या भागात साधारण ३००० केल्व्हिन. या काळ्या भागाला सौर डाग म्हणतात.

साधारणतः एक सौर डाग पृथ्वीच्या आकाराशी तुलना करता येईल एवढा मोठा असतो. सौर डागांच्या मधोमध गडद भाग असतो. ज्याला उम्ब्रा आणि फिकट भागाला पेनुम्ब्रा असे म्हणतात. या डागाच्या मध्यातून तंतूसारख्या बाहेर आलेल्या काळ्या रेषा दिसत आहेत. या काळ्या रेषाची चुंबकाभोवती लोखंडाचे कणांची रचना असते. त्याच प्रकारची दिसते. सौर डागांमधे चुंबकीय क्षेत्राचे योगदान त्यातूनच लक्षात यावे. अनेक छोटे डाग एकत्र येऊन कधी-कधी असा मोठा आणि अतिशय गुंतागुंतीची रचना असणारा मोठा सौर डाग तयार होतो.

# सूर्याची तशी १०८ नावे आहेत!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पण किमान २१ किवा १२ किंवा ५ नावे दररोज घ्यावीत.

१२ प्रमुख नावे अशी
१) ॐ मित्राय नमः
२) रवये नमः
३) ॐ सुर्याय नमः
४) ॐ भानवे नमः
५) ॐ खगाय नमः
६) ॐ पुष्णे नमः
७) ॐ हिरण्यगर्भाय नमः
८) ॐ मरीचेय नमः
९) ॐ आदित्याय नमः
१०) ॐ सवित्रेय नमः
११) ॐ अर्काय नमः
१२) ॐ भास्कराय नमः

**आदिदेव नमस्तुभंम् प्रसिद मम भास्कर !**
**दिवाकर नमस्तुभंम् प्रभाकर नमस्तुते!!**

दररोज या नावांनी सूर्याला जलार्पण केल्यास मानसन्मान, प्रतिष्ठा उत्कर्ष प्रगती होते व शारीरिक बल, ऊर्जा वाढते.

# मना सज्जना...

## नको रे मना

**नको रे मना क्रोध हा खेदकारी ।**
**नको रे मना काम नाना विकारी ।**
**नको रे मना सर्वदा अंगिकारू ।**
**नको रे मना मच्छरु दंभ भारु ॥ ६ ॥**

हा श्लोक मनाशी थेट आर्जवी संवाद साधणारा आहे. समर्थ रामदास स्वामी येथे मनाला सबुरीचा सल्ला देत समजावतात, सावध करतात. ‘ नको रे मना ’ हे आम्हाला अंतर्मुख करणारे असे आवाहन आहे.


समर्थ म्हणतात,

**‘ नको रे मना क्रोध हा खेदकारी ’**

क्रोध हा काही क्षणासाठी येतो, तो वादळी वावटळीसारखा. परंतु जातो तेव्हा त्यामागे उरतो तो केवळ विध्वंस. मन, चित्त दुभंग करणारा, नातेसंबंधात वितुष्ट आणून सैरभैर करणारा. आपल्या कृतीचा आपल्यालाच पश्चाताप करायला लावणारा खेद मात्र जीवाला जाळत मागे राहतो. क्रोधात उच्चारलेले कटू शब्द बाणासारखे सुसाट असतात. ते परत घेता येत नाहीत. क्रोधात केलेली कृती आयुष्यभर मनाला बोचत राहते. पण वेळ निघून गेलेली असते आणि अपरिमित हानी उरते. जेव्हा क्रोध व्यक्तीवर स्वार होतो तेव्हा विवेकाचा दीप मात्र विझून गेलेला असतो.

**‘ नको रे मना काम नाना विकारी ’**

येथे ‘ काम ’ या शब्दाचा अर्थ केवळ देहाची भूक एवढा मर्यादित नाही. काम म्हणजे अतृप्त कामना. अनाठायी हाव, आसक्ती, अतृप्त इच्छा या साऱ्या मनाला अस्वस्थ करतात, आतून पोखरतात.



त्याने व्यक्ती विकारवश होऊन त्या कामना पूर्ण करण्यासाठी चुकीचा मार्ग अनुसरण करते. परिणामी त्याचे वर्तन समाजात निंदनीय ठरते.

**‘ नको रे मना सर्वदा अंगीकारू ’**

समर्थ षड्रिपूंपासून सावध करतात. काम, क्रोध, लोभ, मद आणि मत्सर यापासून कोणताही मानव अलिप्त राहू शकत नाही. या दोषांनी अलिप्त पुरुष सापडणे अशक्यच. या श्लोकात ‘ मद ’ या दुर्गुणाचा उल्लेख नाही. किंबहुना या श्लोकातील तिसऱ्या चरणात तो अंतर्भूत असावा, असे वाटते. तेव्हा हे सारे दोष आपले आहेत, असे मानून त्यांना कवटाळू नको. त्यांचा सतत अंगीकार करू नको, असा आपल्याला उपदेश करतात. हे षड्रिपूच आपल्या अधःपतनाला कारणीभूत ठरतात. याची उदाहरणे आपल्याला नेहमी आजूबाजूला पाहावयास मिळतात.

**‘ नको रे मना मच्छरु दंभ भारु ’**

आपण नेहमी इतरांसोबत आपली तुलना करीत असतो. हेवा करीत असतो. तो मनुष्य स्वभाव आहे. परंतु पुढे याचे पर्यवसान नकळत मत्सरात होते. आपण आपल्या दुःखापेक्षा इतरांच्या सुखाने जास्त दुःखी होतो. त्याला कारण हा मत्सरच. मत्सर दुसऱ्याला नाही, तर स्वतःलाच जाळतो. यातून मग अभिमान उपजतो, गर्व निर्माण होतो. तसेच ‘ दंभ ’ या दुर्गुणाचे आहे. दंभ म्हणजे आपण जे प्रत्यक्षात नाही आहोत तेच असल्याचा पोकळ टेंभा मिरविणे. दंभ माणसाला इतरांपासून वेगळे असल्याचा आव आणतो. प्रत्यक्षात मात्र माणूसपणापासून दूर नेत राहतो.

तुकोबा म्हणतात,,
**बरा कुणबी केलो । नाहीतर दंभे असतो मेलो ॥**
**भले केले देवराया । नाचे तुका लागे पाया ॥**

या अभंगात तुकोबा देवाचे आभार मानतात. देवाने कुणबी केले म्हणजे शेती-मातीशी असलेली त्यांची नाळ घट्ट केली. अन्यथा सावकारी करणाऱ्या श्रीमंत तुकोबांना त्यांच्या दंभाने बुडवले असते. अहंकाराने त्यांच्यातील करुणा मारून टाकली असती. अहंकाराचा भार मनाला अधिकाधिक जड करतो. समर्थांचे या श्लोकातील हे चारदा ‘ नको रे मना ’ संबोधणे खरेतर नकार नसून मनाला नितळ, हलके आणि निर्मळ करण्याचा करुणेने दिलेला सल्लाच आहे. क्रोध, काम, मत्सर, दंभ यांना दूर ठेवले, तर मन शांत होते. शांत मन सहजच भगवत भक्ती, विवेक आणि शांतीकडे वळते. त्यातून खरे समाधान मनुष्याचा वाट्याला येते. तेव्हाच मनाचे मनुष्यपण जागे होते.

**जय जय रघुवीर समर्थ!**

**- भाऊसाहेब देशमुख,**
**मो. : 94203 89541**

